**नि. फौ. ख. क्र.७१/२०१८**
**सरकार विरुध्द साईनाथ व इतर**
**निशाणी क्र. ३१**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२**
मी शपथेवर निवेदन करतो की,

नाव– **विठ्ठल अर्जुन कावडे,**
वय– **७०** वर्षे, धंदा– शेती**,**
रा. **हस्नाळी, ता.धर्माबाद, जि. नांदेड.**

**<u>सरकारी वकील श्रीमती. सी.बी. काळे यांच्यामार्फत साक्षीदाराचा शपथेवर सरतपास सुरु.</u>**

०१. मी आरोपींना ओळखतो. ते माझे गावातील आहेत. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत. फिर्यादी शेषेराव यांना मी ओळखतो तो माझया गावचा आहे. फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये घटना ही दि.०३/०४/२०१८ रोजी हस्नाळी शिवारात गट क्र.१२ मध्ये सकाळी ०८.०० वा.च्या सुमारास घडली. त्यावेळी मी गट क्र.१२ च्या रोडवर उभा होतो. मी, फिर्यादी शेषेराव, त्याचा भाऊ नारायण, फिर्यादीचा चुलत भाऊ पंढरी अर्जुन कावडे, गंगाबाई प्रकाश कावडे व संतोष भाऊराव कावडे असे सर्वजन गट क्र.१२ मध्ये असलेल्या विहीरी जवळची समाधी साफ करण्यासाठी गेलो होतो. साफसफाई चालु असताना तिन्ही आरोपी तेथे आले. साईनाथ कावडे फिर्यादी शेषेरावला म्हणाला येथे तुमचे काही नाही तुम्ही समाधी साफ करू नका येथील संपुर्ण जमीन मी खरेदी केली आहे असे म्हणाला. त्या चौघांनी शेषेरावला ढकलुन दिले आणि मारहाण केली. साईनाथने त्याला ढकलुन दिले. धोंडीरामने त्याला धरले. हणंमतने त्याच्या हातातील लाकडाने शेषेरावच्या डोक्यात मारले. त्यामुळे त्याचे डोके फुटुन रक्त निघाले. नंतर हनंमतने शेषेरावच्या पायावर, हातावर, छातीवर व पाठीवर लाकडाने मारले. त्यानंतर मी घरी गेलो. ज्या लाकडाने आरोपींनी शेषेरावला मारहाण केली आहे ते लाकुड मला दाखवले तर मी ओळखू शकतो.

**सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरून उर्वरित सरतपास पुढील तारखे पर्यंत तहकुब करण्यात आला.**

दिनांक १८/०३/२०२६
वा.दा.ब.अ.क.केले.

सही/–

(एस.एम.कोळेकर)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,धर्माबाद.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/–

(एस.एम.कोळेकर)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद.